# 15 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

अशक्य ते शक्य करण्यात एक वेगळीच मजा आहे.

**आजचे पंचांग :**

वार – मंगळवार | दिनांक : 15 फेब्रुवारी 2022

तिथी – माघ | नक्षत्र – पुष्य

सुर्योदय – सकाळी 6.59 वाजता | सूर्यास्त – सायंकाळी 6. 35 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1564 ला महान खगोल शात्रज्ञ गॅलीलियो गॅलेली यांचा जन्म.

1949 ला प्रसिद्ध मराठी कवी नामदेव लक्ष्मण ढसाळ यांचा जन्म.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Guava – पेरू 2) Fig - अंजीर 3) Tamarind – चिंच 4) Pomegranate – डाळींब

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) 5 सफरचंद आणि 7 सफरचंद यांची बेरीज किती होईल?

2) तुम्ही घरी पिण्याचे पाणी कोठून आणता?

3) कोणत्याही चार द्विदल धान्यांची नावे सांगा.

4) पृथ्वी कोणत्या ताऱ्याभोवती फिरते?

**बोधकथा :**

## पक्षी आणि पारधी

एक पारधी अरण्यात पक्षी धरण्यासाठी जाळे लावत असता जवळच झाडावर बसलेला एक पक्षी त्याला विचारू लागला, 'अरे, हे तू काय करतो आहेस?' यावर पारधी म्हणाला, 'तुमच्यासारख्या पक्ष्यांकरता हे शहर बांधतो आहे. यात जे पक्षी येऊन राहतील त्यांना कोणत्याही गोष्टीची अडचण पडणार नाही. चारा, पाणी चिकार असेल. राहायला तरतऱ्हेची घरं अन् झोपायला मऊ गादी असेल.' पक्षाला ते सर्व खरे वाटले व पारधी जाताच तो त्या जाळ्यात शिरला व अडकला. ते पाहून बरेच पक्षी जमा झाले तेव्हा त्या सर्वांना त्याने सावध केले. तो सांगू लागला, 'यात मी फसून सापडलो, तो पारधी गोड गोड बोलून तुम्हालाही भुलविण्याचा प्रयत्न करेल. त्यावर तुम्ही विश्वास ठेऊ नका.' हे ऐकून सगळे पक्षी निघून गेले. काही वेळाने पारधी येताच तो पक्षी त्याला म्हणाला, 'अरे लबाडा, तू मला फसवलेस, पण तुझ्या या सुंदर शहरात आता एकही पक्षी राहायला येणार नाही, याबद्दल खात्री असू दे !'

**तात्पर्य** - लबाड लोकांची लबाडी जोवर लक्षात येत नाही तोवर ते दुसऱ्याला फसवू शकतात पण लबाडी उघडकीला आली की लोक त्याच्या वाऱ्यालाही उभे रहात नाहीत.